# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक ०३.०५.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०२.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १६ ईसमावर कारवाई करून एकुण १,३२,७८५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच,

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,८५२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,३२,४००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्रं.२ पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत. त्याच अंतर्गत,

दिनांक ०२.०५.२०२६ चे १८.०० वा. ते १९.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट ०२ पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत अंबाझरी बायपास रोड, कॅम्पस चौक येथील जेनझिस कॅफे येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी तक्षक युवराज भवरे वय २० वर्ष रा. प्लॉट नं. ३११, सहयोग नगर, नारी रोड, कपिलनगर, नागपूर हा शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता ग्राहकांना पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण १४,४३०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींचे विरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम ४,(१)(२१), ५(१)(२१) सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह अंबाझरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (अति.कार्य.डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस

आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०५.२०२६ चे १८.२० वा. चे सुमारास, फिर्यादी सौ. प्रियंका गौतम सांदरे वय ३५ वर्ष रा. राजीव नगर, पराने कंट्रोलजवळ, प्रभाग क्र. ०२, एम.आय.डी.सी. नागपूर ह्या त्यांची ननद नामे अनिता विनोद नरगडे वय ४० वर्षे रा. सुनिल सांगडे यांचे घरी किरायाने, राजीव नगर, एम.आय.डी.सी., नागपूर यांचेसह पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीतील आयशा ऑटोमोबाईल कंपनी येथे दिवसभर काम करून मनीषा फुलझले नावाच्या महीलेसह घरी पायदळ जात असता, पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत वसुंधरा कंपनी समोर, हिंगणा रोड येथे फिर्यादीचे ननदेसोबत पुर्वी स्कुल व्हॅनमध्ये काम करणारा शुभम नावाचा ईसम हा हातात चाकु घेवून त्यांचे समोर आला व त्याने सर्वांना चाकुचा धाक दाखवून फिर्यादी व मनिषा फुलझले यांना धमकावून बाजूला करून चाकुने फिर्यादीची ननद अनिता विनोद नरगडे वय ४० वर्षे हिचे खांद्यावर व कमरेवर वार करून तिला गंभीर जखमी केले. जखमीला उपचाराकरीता शालीनीताई मेघे हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले. घटनास्थळाहुन पळून जाणारा आरोपी शुभम यास जमलेल्या लोकांनी पकडून पोलीसांचे स्वाधीन केले.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे पोउपनि दिलीप थोरवे ९५२७४२७८४६ यांनी आरोपी शुभम सावद वय ३२ वर्षे रा. राजीव नगर, एम.आय.डी.सी., नागपूर याचे विरूध्द कलम १०३(१), ३५१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे कळमना :— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०५.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, कळमना पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, आभा कॉलोनी, भरतवाडा रोड, नाल्याजवळ एक ईसम हातात तलवार घेवुन, धुमधाम करीत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम हातात लोखंडी तलवार घेवुन धुमधाम करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेवुन निशस्त्र केले. आरोपीस पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव राहुल उर्फ शेंडी किशोर गेडाम वय २० वर्षे, रा. पुंजाराम वाडी, सोनु किराणा जवळ, डिप्टी सिग्नल, कळमना, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी तलवार किंमती ५००/— रू. ची जप्त करण्यात आली.

आरोपी हा सराईत गुन्हेगार असून हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. मंगेश लोही यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. ज्ञानेश्वर मोरे यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा. ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे लकडगंज :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०१.०५.२०२६ चे १८.३० वा. ते ०२.०५.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, घर क्र. ३९०, गजानन महाराज मंदीरमागे, लाकडीपूल, नागपुर येथे राहणारे फिर्यादी सचिन आनंदराव रणदिवे, वय ४२ वर्षे हे आपले राहते घराचे मुख्य दाराला कुलूप लावून परिवारासह चुलत भाऊ नामे

सुदल रणदिवे यांचे लग्नाकरीता वडसा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, आंत प्रवेश करून, घरातील आलमारीत ठेवलेले रोख १,००,०००/—रू., तसेच सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ७,३७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. चेतनसिंग राजपूत ९७६४०२०१९४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कळमना :—** दिनांक ०२.०५.२०२६ चे ०१.१७ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, कामना नगर, रेल्वे फाटक ते विजय नगरचे मध्ये पुलावरील डाऊन रेल्वे लाईनवर एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे वयाचे रेल्वे ची धडक लागुन मृत अवस्थेत मिळुन आले. मृतकाचे शव पुढील कार्यवाहीस्तव मेयो हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले आहे. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

यापकरणी फिर्यादी रेल्वे पोलीस गौरीशंकर प्रसाद यादव, वय ४३ वर्षे, रा. मोतीबाग रेल्वे क्वॉटर, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. अजय गरजे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे धंतोली :—** गोदावरी बिहारीलाल यादव, वय १५ वर्षे, रा. राजाटोला, पोष्ट. आमाटोला, तहसील चौक, जि. राजनांदगाव ह.मु. अजनी यार्ड, रेल्वे पटरी बाजूचे झोपडे, नागपूर ही दिनांक ३०.०४.२०२६ चे १७.०० वा. पोलीस ठाणे धंतोली हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ४ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाचा सलवार सुट, व गळ्यात लाल—काळ्या रंगाचा धागा त्यामध्ये एक गोल आकाराचा मणी घातलेला आहे. भाषा— हिंदी/छत्तीसगडी बोलते.



गोदावरी

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**